# प्रकरण चौथे
# कमवा व शिका योजनेची
# शिवाजी विद्यापीठातील अंमलबजावणी

# प्रकरण - चौथे

# कमवा व शिका योजनेची शिवाजी विद्यापीठातील अंमलबजावणी

कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवारांनी दृढ श्रद्धेने आणि अविश्रांत श्रमाचे खतपाणी घालून शिवाजी विद्यापीठाच्या या इवल्याशा रोपाचा वेलू गगनावरी नेला. त्याचेच रूपांतर आज विशाल वृक्षात झालेले आहे. प्रारंभीच्या काळात विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधून विद्यापीठाची चौफेर प्रगती करण्यासाठी त्यांनी विविध योजनांची सुरूवात केली. त्याअंतर्गत बहुजन समाजातील गरीब विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठात 'कमवा व शिका' या योजनेची सुरूवात डॉ. आप्पासाहेब पवारांनी केली. अशा या आगळ्यावेगळ्या योजनेचा आढावा प्रस्तूत प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

**शिवाजी विद्यापीठाची स्थापना व विकास :**

राजर्षी शाहू छत्रपतींनी केलेल्या समाजसुधारणा व शिक्षण प्रसाराचे कार्य आणि रयत शिक्षण संस्थेचे कार्य यामुळे शिवाजी विद्यापीठ स्थापनेला अनुकूल पार्श्वभूमी तयार झाली होती. दक्षिण महाराष्ट्रात स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेसाठी जनतेने केलेल्या प्रयत्नामुळे १९६२ साली कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली. राज्य शासनाने डॉ. आप्पासाहेब पवार यांची शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून नेमणूक केली. अमृतमय ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी विद्यापीठांनी एखाद्या सुंदर मनोऱ्यात न राहता सामान्य जनतेपर्यंत जाऊन पोहोचले पाहिजे कारण विद्यापीठ ही केवळ ज्ञानसंस्था नसून एक समाजसंस्था आहे. या ध्येयाने प्रेरित होवून डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या नेतृत्त्वाखाली शिवाजी विद्यापीठाची वाटचाल सुरू झाली. २० सप्टेंबर, १९६२ ते २१ जानेवारी, १९७५ या तेरा वर्षांच्या

प्रदीर्घ कालखंडात कुलगुरू म्हणून आप्पासाहेबांनी शिवाजी विद्यापीठाची जडणघडण केली आणि त्याच्या भावी वाटचालीचा भक्कम पाया घातला.[१]

शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली असली तरी त्याच्या उभारणीचे आव्हान या नूतन कुलगुरूंच्यासमोर उभे राहिले होते. या नवीन विद्यापीठात स्वत:ची जागा व इमारत नसल्यामुळे त्याची सुरूवात भाड्याने घेतलेल्या एका खाजगी इमारतीत झाली होती. सन १९६३ मध्ये महाराष्ट्र सरकारने 'स्पेशल लँड ॲक्विझिशन ऑफिसर' व त्यांचा स्टाफ नेमून विद्यापीठासाठी कोल्हापूरच्या मध्यापासून सुमारे दोन मैल अंतरावरील सागरमाळ येथील १,०४७ एकर निश्चित केलेली जमीन ताब्यात मिळण्याची व्यवस्था केली.[२] त्यापैकी ४३८ एकर जमीन संपादित करून तिचा ताबा लगेचच विद्यापीठाकडे सोपविण्यात आला.[३] २८ सप्टेंबर, १९६३ रोजी आप्पासाहेबांनी विद्यापीठ परिसरात श्रमदान शिबीर आयोजित केले होते.[४] विद्यार्थ्यांसह सुमारे ३००० लोक या श्रमदानात सहभागी झाले होते. रस्ते आखणे, सीमारेषा आखणे, झाडे लावणे, पाणी—पुरवठ्याची व्यवस्था करणे अशी सुमारे ५००० रूपये एवढ्या किंमतीची कामे या श्रमदानातून करण्यात आली.[५] १९६४ च्या अखेरीस विद्यापीठाला स्वत:च्या सर्व जमिनीचा ताबा मिळाला.[६] नोव्हेंबर, १९६४ मध्ये विद्यापीठाचा पायाभरणी समारंभ पार पाडण्यात आला.[७] यानंतर १९६४ च्या नोव्हेंबर—डिसेंबरमध्ये श्री. आर. एस्. बेदी, श्री. एस. के. कारेकर, श्री. ए. एन. सूर्यवंशी डिझाईन कोलॅबोरेटिव्ह या वास्तुशास्त्रज्ञांनी ग्रंथालय, अभ्यागतगृह, विज्ञान विभाग (पदार्थ विज्ञान, गणित, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र), मुलांचे व मुलींचे वसतिगृह, शिक्षक निवास्थान, कुलगुरू निवासस्थान इत्यादी इमारतींचे आराखडे तयार केले.[८] त्यानुसार इमारतींचे बांधकाम सुरू करून पुढील दोन—तीन वर्षांच्या कालावधीत या सागरमाळाचा कायापालट करून आप्पासाहेबांनी तेथे विद्यानगरी निर्माण केली.

शिवाजी विद्यापीठाचे प्रशासन कार्यक्षम, गतिमान आणि लोकाभिमुख करून जनमानसात विद्यापीठाची उठावदार प्रतिमा तयार करण्याकडे डॉ. पवारांनी जास्तीचे लक्ष दिले. विद्यापीठाचे बोधवाक्य आणि बोधचिन्ह ठरविण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रातून निवेदन देण्यात आले. तसेच विविध मान्यवरांच्याकडून सूचनाही मागविण्यात आल्या. दि. ११ जुलै, १९६४ रोजी झालेल्या विद्यापीठ कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये विविध बोधचिन्हांवर चर्चा झाली.[९] त्यानंतर या बोधचिन्हामध्ये विद्यापीठाचे नाव, ज्या युगपुरूषाच्या नावाने हे विद्यापीठ सुरू करण्यात आलेले आहे. त्या छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा, त्यांच्या सामर्थ्याचे प्रतिक म्हणून ढाल—तलवार, विद्येचे द्योतक म्हणून ग्रंथ आणि विद्यापीठाच्या कक्षेत कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर व रत्नागिरी हे पाच जिल्हे येतात. म्हणून पाच 'ज्योतींचा दिवा' या गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आला. तसेच 'ज्ञानमेवामृतम' (ज्ञान हेच अमृत) हे बोधवाक्य म्हणून स्वीकारण्यात आले.[१०] बोधवाक्यानुसार ग्रामीण भागात ज्ञानाचा प्रसार करून जनतेला शिवाजी विद्यापीठाबद्दल जिव्हाळा, आपुलकी वाटावी म्हणून आप्पासाहेबांनी विद्यापीठाच्या वतीने संस्थाचालक व प्राचार्यांच्या बैठका घेवून त्यांना नवीन ध्येय, उद्दिष्टाने प्रेरित केले. विद्यापीठात बहि:शाल शिक्षण मंडळाची स्थापना करून त्यामार्फत खेडोपाड्यात ग्रामशिबिरे घेवून विद्यापीठाच्या कामाची ओळख बहुजन समाजाला करून देण्याचा अभिनव उपक्रम हाती घेतला आणि "Taking the University to the masses and making them education minded is our motto" हे शिवाजी विद्यापीठाचे ब्रीद असल्याचे दाखवून दिले.[११]

डॉ. आप्पासाहेब पवार यांनी विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून अगदी अल्पावधीत शिवाजी विद्यापीठ हे घोटाळाविरहीत व उत्तम प्रशासन व्यवस्था असलेले विद्यापीठ आहे, असा नावलौकिक महाराष्ट्रात या विद्यापीठास मिळवून दिला. तसेच विद्यापीठाच्या बाह्यांग उभारणीबरोबरच अंतरंग उभारणीसाठी त्यांनी विविध उपक्रमांच्याबरोबर विद्यार्थ्यांसाठी काही नवीन योजनाही सुरू केल्या. विद्यार्थ्यांनी स्वत:चे प्रश्न स्वत: सोडवावेत,

त्यांच्यामध्ये स्वत:ची कर्तव्ये आणि जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांची प्रचंड कार्यशक्ती विधायक कार्याकडे लावण्यासाठी आप्पासाहेबांनी विद्यापीठात १९६५ मध्ये 'विद्यार्थी कल्याण मंडळाची' स्थापना केली.[१२] विद्यार्थी कल्याण मंडळाच्यावतीने त्यांनी खेड्यापाड्यातील झोपडी–झोपडीतून पसरलेल्या अठरापगड जातीच्या बहुजन समाजातील अनेक गुणवान विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी 'कमवा व शिका' योजनेची सुरूवात १९६९ साली विद्यापीठात केली.[१३] कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी स्वावलंबी तत्त्वावर चालविल्या जाणाऱ्या 'कमवा व शिका' योजनेची यशस्वी अंमलबजावणी रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये करून दाखविली होती. ज्याचे मनगट बळकट आहे अणि ज्याची कष्ट करण्याची तयारी आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी ही क्रांतीकारी योजना आप्पासाहेबांनी विद्यापीठात सुरू केली. विद्यापीठाच्या जडणघडणीत या योजनेचा सहभाग फार महत्त्वाचा आहे.

## 'कमवा व शिका' योजना विद्यापीठात सुरू करण्यामागची कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांची भूमिका :

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर डॉ. आप्पासाहेब पवार यांनी ग्रामीण भागात उच्च शिक्षणाच्या प्रसाराला जोमाने सुरूवात केली. आप्पासाहेब हे सार्वत्रिक शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे प्रामुख्याने ग्रामीण भागात विस्तारलेले होते. या विद्यापीठाने केवळ विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ठराविक अभ्यासक्रम शिकविणे. एवढ्यापुरतेच आपले कार्य मर्यादित न ठेवता, या भागाचा शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास करून बहुजन समाजात उच्च शिक्षणाचा प्रसार करणे गरजेचे आहे असे डॉ. आप्पासाहेबांचे मत होते. कारण त्याकाळात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या घरात शिक्षणाची परंपरा नव्हती तसेच त्यांचे आई–वडीलही शिकलेले नव्हते, त्यामुळे या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नव्हते. तसेच घरची आर्थिक

परिस्थिती गरिबीची असल्यामुळे त्यांना उच्च शिक्षण घेता येत नव्हते म्हणून अशा या बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी श्रमावर आधारित अशी 'कमवा व शिका' ही योजना अगदी उपयुक्त आहे अशी आप्पासाहेबांची धारणा होती. यामुळे त्यांनी खेड्यापाड्यातील झोपड्यातून पसरलेल्या अठरापगड जातीच्या बहुजन समाजातील अनेक गुणवान विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता वाढवून त्यांच्यात उच्च शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून 'कमवा व शिका' ही योजना विद्यापीठ स्तरावर सुरू केली.[१४]

शिवाजी विद्यापीठ हे केवळ ज्ञानसंस्था होवून चालणार नाही तर ज्ञान निर्मिती व ज्ञान वितरण हेच या विद्यापीठाचे प्रमुख कार्य असायला हवे असे आप्पासाहेबांचे विचार होते. आजपर्यंत बहुजन समाजाचे अज्ञान व परावलंबित्त्वामुळे खूप नुकसान झाले आहे. नव्या ज्ञानाची नवी क्षितीजे ही विद्यापीठाने गरिबांच्या झोपड्यांपर्यंत पोहचविली पाहिजेत, कारण शिक्षणाने कर्तृत्त्व निर्माण होवून कोणत्याही क्षेत्रात प्रभावी कार्य करण्याची क्षमता निर्माण होते.[१५] परंतु शिक्षण घेतलेल्या शिक्षितांना श्रमाची लाज वाटते हा तत्कालिन अनुभव लक्षात घेवून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांनी 'कमवा व शिका' ही योजना विद्यापीठात सुरू केली.

"Labour without genious shall in the long run do more than genious without labour. शेवटी कष्ट, कष्ट आणि कष्ट या तत्त्वानुसार प्रत्येकाने आपल्या मनास व शरीरास मोड दिली पाहिजे अशी भूमिका ही योजना विद्यापीठात सुरू करण्यामागे आप्पासाहेबांची होती."[१६] पदव्युत्तर शिक्षण ही खरी ज्ञानाची कसोटी आहे. शिक्षण म्हणजे नुसती पोपटपंची नसून मिळालेले ज्ञान आत्मसात करून त्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी व राष्ट्रासाठी झाला पाहिजे आणि असे झाले नाही तर ते शिक्षण फुकट गेले असे आप्पासाहेब म्हणत असत.[१७] बहुजन समाजातील विद्यार्थ्यांमध्ये यशस्वी होण्याची जिद्द व मोडेन पण वाकणार नाही. अशी भावना जागृत होवून जाणीव जागृती निर्माण व्हावी म्हणून त्यांना श्रमाच्या बदल्यात

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्वावलंबन, स्वयंप्रेरणा, परिश्रम, शिस्त, आत्मविश्वास आणि श्रमप्रतिष्ठा या सुसंस्कारावर आधारित अशी ही योजना आप्पासाहेबांनी विद्यापीठात सुरू केली.[१८]

कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर लगेचच विद्येचा व विद्यादानाचा मक्ता मिरवणाऱ्या काही पुणेकरांनी 'कोल्हापुरात आणखी एक खानावळ सुरू झाली' असे हेटाळणीचे उद्‌गार काढले होते.[१९] अशा कठीण परिस्थिती आप्पासाहेबांनी शिक्षण, प्रशासन, विस्तारकार्य इत्यादी क्षेत्रात जिद्दीने कार्य केले. शिवाजी विद्यापीठ हे एक ग्रामीण विद्यापीठ असल्यामुळे ते खऱ्या अर्थाने ग्रामीण जनतेचे विद्यापीठ व्हावे ही तळमळ त्यांच्या अंतरंगातून ओसंडून वाहत होती. यामुळे बहुजन समाजातील गरीब, गुणी व होतकरू विद्यार्थ्यांना विद्यापीठ परिसरात शिक्षणाची संधी देणारी 'कमवा व शिका' ही स्वावलंबी योजना सुरू केली. आप्पासाहेबांच्या मते विद्यार्थ्यांचा शारीरिक, वैचारिक, बौद्धिक व शैक्षणिक असा सर्वांगिण विकास साधणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्यात कोणत्याही क्षेत्रात प्रभावी कार्य करण्याची क्षमता निर्माण झाली पाहिजे; यासाठी त्यांनी परिश्रम केले पाहिजेत कारण विद्यार्जन हे तप आहे व तप हे कष्टावाचून होत नाही. अडीअडचणींच्या काळातच माणसाची खरी कसोटी लागते. त्यामुळे अगदी शेवटच्या थरापर्यंत उच्च शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचली पाहिजे या विचारातून आप्पासाहेबांनी श्रमाचा आदर करायला शिकविणारी अशी 'कमवा व शिका' ही योजना विद्यापीठात सुरू करून शैक्षणिक क्रांतीबरोबर समाजात समता प्रस्थापित करण्यास सुरूवात केली.[२०] "ज्यांचा जन्म खेड्यात झाला आहे, जो शेणा—मातीत वाढलेला आहे, अशा महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला जर शेणामातीची लाज वाटू लागली तर तो शिकून अडाणीच राहिला असे आप्पासाहेबांचे मत होते."[२१] शिक्षण घेवूनही खेड्यातील शिक्षित तरूण जर पांढरपेशीपणाचा आव आणून शेतीकाम करण्यास कचरेल, शेण काढण्यास अगर पाण्याची घागर आणण्यात कमीपणा मानत

असेल तर अशा शिक्षणाचा काहीही उपयोग नाही असे आप्पासाहेबांचे विचार होते. म्हणूनच विद्यार्थ्यांच्यात श्रमप्रतिष्ठा वाढीस लावून उच्च शिक्षणाबरोबर स्वावलंबनाचे धडे देणारी अशी ही 'कमवा व शिका' योजना विद्यापीठात डॉ. आप्पासाहेब पवारांनी सुरू केली.

'कमवा व शिका' ही योजना एकंदर शिक्षण व्यवस्थेमधील मैलाचा दगड ठरलेली आहे. या योजनेत शिक्षणाला श्रमाची जोड दिली गेली आहे. विद्यार्थ्यांनी स्वत:च्या हाताने काम केल्यामुळे त्यांच्या मनावर चांगला परिणाम साधला जात असे. त्याचबरोबर कोणतेही काम हलके नसते ही भावना निर्माण करून जगण्याबद्दलचा उदंड आत्मविश्वास व कोणत्याही परिस्थितीशी टक्कर देण्याचं बळ आप्पासाहेबांनी या योजनेतून विद्यार्थ्यांच्यात निर्माण केले.

## शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे 'कमवा व शिका' योजनेचा प्रारंभ:

पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण भागात उच्च शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने लोकभावनेचा आदर करून कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना केलेली होती. राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याची व विचारांची कोल्हापूर ही भूमी होती. या भूमीला एक वेगळी सामाजिक, औद्योगिक व राजकीय संस्कृतीची परंपरा होती. कला, क्रिडा, कृषी क्षेत्रातील समाज परिवर्तनाच्या चळवळीत कोल्हापूरला त्यावेळी एक वेगळे स्थान होते. त्यामुळे कोल्हापुरचे हे विद्यापीठ इतर प्रादेशिक विद्यापीठांची द्विरूक्ती व्हावी असे महाराष्ट्राचे तत्कालिन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना वाटत नव्हते.[२२] शिवाजी विद्यापीठासंबंधीची ही अपेक्षा नामदार यशवंतरावांनी विद्यापीठाच्या पहिल्याच पदवीदान समारंभात व्यक्त करताना महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पायाभूत कार्याचे स्मरण करून दिले आणि विद्यापीठाचे ब्रीद समूर्त करणाऱ्या खालील संस्मरणीय शब्दांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.

“ते अमृत कुठे आहे? समुद्रमंथ करून
जे अमृत निघाले ते देव प्राशन करून बसले.
आता आमच्यासाठी अमृत नाही म्हणून शिवाजी
विद्यापीठाने घोषणा केली की, 'ज्ञानमेवामृतम्'!
त्या देव — दानवांच्या संघर्षामध्ये विषाची आणि
अमृताची वाटणी होवून संपून गेलेली आहे.
आता ज्ञान हेच नवीन अमृत आहे.” [२३]

जनतेची व सरकारची इच्छा पूर्ण करून ग्रामीण जनतेला हे आपले विद्यापीठ वाटावे यासाठी आप्पासाहेबांनी विविध योजनांची सुरूवात विद्यापीठात करून त्यांची यशस्वीपणे अंमलबजावणीही केली. 'कमवा व शिका' ही योजनाही त्यापैकीच एक होय.

उच्च शिक्षणासाठी विद्यापीठात येणाऱ्या विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था करण्यासाठी मुलांसाठी एक व मुलींसाठी एक अशी दोन वसतिगृहे विद्यापीठात बांधून त्यामध्ये दि. ८ ऑगस्ट, १९६६ पासून विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देण्यास सुरूवात केली आली.[२४] या वसतिगृहात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आर्थिक दुरावस्थेमुळे प्रवेश घेता येत नव्हता. कारण तत्कालिन ग्रामीण भागात अंधश्रद्धा व दारिद्र्याचेच साम्राज्य होते. त्यांच्या झोपड्यांत अज्ञानाचा अंधार हा घर करून राहिलेला होता. आर्थिक गरिबी ही उच्च शिक्षणाच्या आड येवू नये म्हणून कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार व कुलसचिव डॉ. उषा इथापे यांनी स्वावलंबी शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यातूनच संलंग्न महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व प्राचार्य यांचे दि. २८ व २९ नोव्हेंबर, १९६७ रोजी दोन दिवसांचे चर्चासत्र विद्यार्थी कल्याण मंडळाच्यावतीने आयोजित केले गेले.[२५] त्यामध्ये विद्यार्थी कल्याण मंडळाचे एक सदस्य क्रिडामहर्षी मेघनाथ नागेशकर यांनी 'विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी श्रमदानातून भवन बांधण्याची कल्पना समोर मांडली, तेव्हा सर्वांनी तिला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.[२६] लगेचच २९ नोव्हेंबर, १९६७ रोजी या वास्तूच्या कामाचा शुभारंभ मेघनाथ

नागेशकर यांच्या हस्ते केला गेला.[२७] सांगलीच्या वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग च्या श्री. शहा या विद्यार्थ्याने तयार केलेला इमारतीचा आराखडा स्वीकारण्यात आला.[२८] विद्यापीठाच्या तत्कालिन कार्यकारिणीने या इमारतीसाठी अडीच लाखांचा अंदाजित खर्च मंजूर करून प्राथमिक खर्चासाठी एक लाख रूपयांचा पहिला हप्ताही मंजूर केला.[२९] ८ एप्रिल ते १२ जून, १९६८ या कालावधीत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयातील २२५ विद्यार्थ्यांनी श्रमदानातून १८ खोल्यांच्या संपूर्ण इमारतीचे खांब उभे करून अर्ध्या इमारतीचा स्लॅबही पूर्ण केला.[३०] तसेच ४ ऑगस्ट, १९६८ रोजी संलग्न महाविद्यालयातील सुमारे १५० विद्यार्थ्यांनी राहिलेल्या निम्म्या इमारतीचा स्लॅब पूर्ण केला.[३१] तर २९ सप्टेंबर, १९६८ रोजी स्वयंपाकघराच्या इमारतीचा स्लॅब स्थानिक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पूर्ण केला.[३२] या श्रमदानात मुलांबरोबर मुलींचाही सहभाग होता. विद्यार्थ्यांनी स्वत:ची इमारत स्वत:च्याच श्रमदानातून अगदी कमी कालावधीत उभारण्याची ही घटना अवघ्या शिक्षण क्षेत्रात अभूतपूर्व होती. अशा प्रकारे ज्ञानसाधनेबरोबर श्रमप्रतिष्ठा वाढविली पाहिजे हा मंत्र आप्पासाहेबांनी विद्यार्थ्यांना दिला. विद्यार्थ्यांच्या मताने व विद्यापीठ अधिकार मंडळाच्या मान्यतेने या भवनला "डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन" असे नांव देण्यात आले.[३३] या भवनामध्ये गरीब व गरजू अशा हुशार मुलांसाठी श्रमावर आधारित अशी 'कमवा व शिका' योजना सुरू करण्याचा आप्पासाहेबांचा विचार होता. त्यानुसार या योजनेचा आराखडा तयार करून त्यांनी तो रीतसर कार्यवाहीसाठी विद्यापीठाच्या विधीसभेच्या मान्यतेसाठी सादर केला.[३४] विधीसभेत या ठरावावर चर्चा चालू असताना अनेक तर्कवितर्क झाले. काहींच्या मते यापूर्वी अशा प्रकारची योजना रयत शिक्षण संस्थेच्या काही शाखांत यशस्वी झालेली असली तरी ती फक्त कॉलेजेस होती व हे एक विद्यापीठ आहे, येथे गुणात्मकतेला जास्त प्राधान्य असून अभ्यासही बोजड असतो. त्यामुळे येथे ही योजना यशस्वी होवू शकत नाही. म्हणून काही मंडळींचा या योजनेला विरोध होता.[३५] तर काही

व्यक्तींनी या योजनेबाबत सकारात्मक दृष्टीकोन दाखविला होता. त्यापैकी छत्रपती शिवाजी कॉलेजच्या 'कमवा व शिका' योजनेचे माजी विद्यार्थी प्राचार्य नारायणराव भगरे यांनी या योजनेच्या समर्थनार्थ जोरदार युक्तीवाद केला.[३६] बहुजन समाजात उच्च शिक्षणाचा प्रसार करण्यास ही योजना फार उपयुक्त आहे. तसेच कोणताही जातीभेद न पाळता विद्यार्थ्यांनी एकत्र येवून श्रम केल्याने जातीभेदाच्या भिंती आपोआप ढासळून समाजात समता प्रस्थापित होण्यास मदत होईल आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढून त्यांच्यात श्रमप्रतिष्ठाही निर्माण होईल. अशाप्रकारे या योजनेबाबत आग्रही भूमिका घेण्यामागे त्यांचे असे मत असावे असे दिसून येते. अखेर विद्यापीठाच्या विधीसभेने 'कमवा व शिका' योजनेचा ठराव संमत करून विद्यापीठात या योजनेची सुरूवात करण्यास मान्यता दिली. त्याआधारे दि. १५ मार्च, १९६९ च्या विद्यार्थी कल्याण मंडळाच्या बैठकीत जून, १९६९ पासून विद्यार्थ्यांना विद्यार्थी भवनमध्ये प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला.[३७] त्यानुसार गरीब पण हुशार मुलांना श्रमाच्या बदल्यात शिक्षण देणाऱ्या 'कमवा व शिका' या योजनेअंतर्गत जुलै, १९६९ पासून विद्यार्थी भवनमध्ये प्रवेश देवून या योजनेची औपचारिक सुरूवात विद्यापीठ परिसरात झाली.[३८] प्रारंभी २५ विद्यार्थ्यांना या योजनेत प्रवेश देण्यात आला. विद्यापीठाचा विस्तृत असणारा परिसर हाच या योजनेचा मूलभूत आधार होता.[३९]

गरीब विद्यार्थ्यांची केवळ राहण्याची सोय करून भागणार नाही तर त्यांच्या इतर सुविधांचीही व्यवस्था करायला हवी. ती व्यवस्था मोफत नव्हे तर कामाच्या बदल्यात व्हावी या हेतूने, आप्पासाहेबांनी विद्यापीठ पातळीवर 'कमवा व शिका' ही योजना राबविली. बहुजन समाजातील हजारो विद्यार्थ्यांची पदव्युत्तर शिक्षणाची सोय या योजनेमुळे झाली.

### योजनेचा विकास :

विद्यार्थी हा राष्ट्राचा ठेवा आहे. त्याचे सळसळते रक्त हे राष्ट्राचे चैतन्य आहे. हे जाणून तरूण विद्यार्थ्यांची मने आणि मनगटे साधण्याची किमया कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी 'कमवा व शिका'

या योजनेद्वारे करून दाखविली. परिस्थितीपुढे हतबल झालेल्या हुशार व गुणी मुलांना उच्च शिक्षणाची संधी श्रमाच्या मोबदल्यात करून देणारी अशी ही योजना होती. शिवाजी विद्यापीठाचा परिसर हा माळरानाचा असला तरी तो खूपच विस्तृत होता. तेथे शेतीयोग्य पडीक जमिनही भरपूर होती. या योजनेतील मुलांना श्रम करण्याची संधी देण्यासाठी अशी शेतीयोग्य जमीन पिकाखाली आणण्याचे आप्पासाहेबांनी ठरविले. त्यानुसार विद्यापीठाच्या कक्षेतील अशी ही खडकाळ जमीन 'ट्रॅक्टर'ने शेतीयोग्य करण्याचे काम मे, १९६९ मध्ये हाती घेतले गेले.[४०] वर्षानुवर्षे ऊन—पावसात तापत असलेली ती खडकाळ जमीन ट्रॅक्टरच्या यांत्रिक शक्तीपुढे उन्मळून पडली. त्या यंत्राने काढलेली मातीची ढेकळे फोडण्याचे काम विद्यार्थी करत होते. तसेच त्यातील दगड तांदळातून खडे निवडावेत तसे निवडून त्याच्या मदतीने शेतीला बांधही घालत होते. साधारण १० ते १५ दिवसामध्येच हे काम पूर्ण झाले.[४१] ज्या ठिकाणी जनावरांनाही चरण्यायोग्य गवत नव्हते त्या ठिकाणी पिकाखाली येण्यायोग्य १५ एकर क्षेत्र तयार झाले.[४२] केवळ अशक्य वाटणारी अशी गोष्ट डॉ. आप्पासाहेबांनी शक्य करून दाखविली. यापैकी सध्या मुद्रणालय ज्या जागेत आहे तेथील ६ एकर जमीन या 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रायोगिक तत्त्वावर कसण्यास देण्यात आली.[४३] योजनेअंतर्गत शिक्षण घेणाऱ्या या पहिल्या २५ विद्यार्थ्यांमधील बहुतांश मुले ही सातारच्या छत्रपती शिवाजी कॉलेजच्या स्वावलंबी योजनेतून शिक्षण घेवून पदवी प्राप्त केलेली होती.[४४] या विद्यार्थ्यांना शेतीचा पूर्वानुभव होता. सर्वानुमते प्रथमत: भुईमूगाचे पीक घेण्याचे ठरले.[४५] त्यानुसार योग्य वेळी जमिनीत तिफणीने (शेतीमध्ये ठराविक पद्धतीने बियाण्याची टोकण करण्यासाठी सऱ्या काढण्याचे शेतकी अवजार/साधन) रेघोट्या मारून त्यात भुईमूगाच्या बियांची टोकण करण्यात आली. पुढे पिकाची योग्य ती काळजी घेतली गेल्यामुळे पीक जोरदार येवून उत्पादनही भरघोस निघाले.[४६] हा प्रयोग शंभर टक्के यशस्वी झाल्यामुळे कुलगुरूंनी विद्यापीठ परिसरातील १५० एकर शेतीयोग्य क्षेत्र योजनेस देऊ

केले.[४७] शेतीसाठी लागणारे सर्व साहित्य सुरूवातीला विद्यापीठाने पुरविले. शेतीतील सर्व प्रकारची कामे करण्याची जबाबदारी ही विद्यार्थ्यांच्यावर सोपविली गेली. प्रसंगी बाहेरच्या मजूरांचीही मदत घेतली जात असे. शेतीत काम करताना विद्यार्थ्यांच्या अंगात शर्ट किंवा बनियन आणि दुमडलेली पॅन्ट असे व तीही चिखलाने माखलेली. शेतीचे काम करताना पडलेले मातीचे डाग हे त्या कपड्यावर कायमचे राहत असत. हे जेव्हा डॉ. आप्पासाहेब पवार व डॉ. उषा इथापे यांच्या निदर्शनास आले तेव्हा त्यांनी योजनेतील मुलांना कामात वापरण्यासाठी खाकी रंगाचा शर्ट, हाफ पॅन्ट व एक घोंगडे दरवर्षी देण्याचे निश्चित केले.[४८]

शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करून उत्पन्न वाढविण्याकडे लक्ष देण्याबाबतचे प्रयत्न योजनेमार्फत सुरू झाले. त्यासाठी राजाराम तलावातून शेतीसाठी पाण्याची सोय करून कोरडवाहू शेतीचे बागायती शेतीत रूपांतर केले गेले.[४९] नोव्हेंबर–डिसेंबर, १९६९ ला पहिली सहामाही संपल्यानंतर ऊसाचे पीक घ्यायचे सर्वानुमते ठरले. सध्याचे नवीन अतिथीगृह ज्या जागेत आहे ती जागा ऊस पिकासाठी ठरविण्यात आली.[५०] या ऊस शेतीसाठी बावड्याच्या कृषी केंद्रातून ऊसाचे बियाणे आणण्यात आले. तसेच मार्गदर्शनासाठी बावड्याच्याच केंद्रातून पीक तज्ञास आणण्यात आले.[५१] ऊसाचा वाघ (ऊस लागण करताना ऊसाच्या वाड्याची आकृती करून पूजा करण्याची शेतकऱ्यांची प्राचीन परंपरा) करून डॉ. आप्पासाहेबांनी ऊसाचे पहिले कांडे जमिनीत पुरून बागायती शेतीची मुहूर्तमेढ रोवली.[५२] १९७०–७१ या शैक्षणिक वर्षात आणखी २५ विद्यार्थ्यांना या योजनेत प्रवेश देण्यात आला.[५३] अशा प्रकारे योजनेतील विद्यार्थ्यांची एकूण संख्या ५० झाली. योजनेतील हे विद्यार्थी शेतीत भात, भुईमूग, ज्वारी, भाजीपाला इ. पीकांचे उत्पादन घेवू लागले. शेतीच्या उत्पन्नातून या योजनेतील मुलांचा सर्व खर्च भागविला जात असे. परंतु योजनेतील विद्यार्थी संख्या वाढल्यामुळे शेतीच्या उत्पन्नातून विद्यार्थ्यांचा खर्च भागविणे अवघड जावू लागले. त्यामुळे पिठाची गिरणी चालविणे, विटांची भट्टी चालविणे, हायवे

कॅन्टीन चालविणे, विद्यार्थ्यांना ग्रंथालयात अर्धवेळ काम देणे अशा प्रकारचे नवीन उपक्रम योजनेअंतर्गत हाती घेण्यात आले. त्यानंतर जमा खर्चाचा मेळ बसून योजनेची आर्थिक घडी व्यवस्थित बसण्यास मदत झाली.[५४] या योजनेअंतर्गत कसल्या जाणाऱ्या शेतीला प्रारंभी काही स्थानिक लोकांचा उपद्रव होत असे. त्यामध्ये प्रामुख्याने विद्यापीठ परिसराच्या पूर्व व पश्चिम बाजूस वसाहती असणाऱ्या कांझारभट लोकांचा समावेश होता.[५५] ते शेतीतील पिकांची चोरी करत. तसेच काही वेळेला उभ्या पिकात जनावरे सोडून पिकांची नासाडी करत असत. योजनेतील मुले त्यांना रंगेहात पकडून त्यांची जनावरे मुख्य कार्यालयासमोर आणून बांधत. काही वेळा भांडणेही होत असत.[५६] भांडून अथवा त्या लोकांना शिक्षा करून हा प्रसंग सुटणार नाही याची खात्री आप्पासाहेबांना होती. त्यामुळे या भटक्या जातीतील मुलांना शिक्षण देवून त्या लोकांचे मन वळविण्याचे कुलगुरू डॉ. आप्पासाहेबांनी ठरविले. त्यासाठी विद्यार्थी कल्याण मंडळाच्या वतीने कांजारभट या भटक्या जमातीच्या मुलांसाठी विद्यार्थीगृहात 'बालक मंदिर' ची सुरूवात दि. १७ नोव्हेंबर, १९६९ रोजी करण्यात आली.[५७] या बालक मंदिरात शिकविण्याचे काम प्रारंभी योजनेतील मुले क्रमाक्रमाने करीत होती.[५८] विद्यार्थीगृहात सुरू असणाऱ्या या बालक मंदिरासाठी स्वतंत्र जागेचीही तरतूद आप्पासाहेबांनी केली.[५९] त्यामुळे आपोआपच या कांजारभट लोकांचा विद्यापीठ शेतीला होणारा उपद्रव हळूहळू कमी झाला. आपले शिक्षण पूर्ण करत असतानाच मागासलेल्या जातीच्या शैक्षणिक उत्थानाचे कार्य विद्यार्थ्यांनी करणे हा एक क्रांतीकारक असा सामाजिक व सांस्कृतिक प्रयोग होता. थोड्याच अवधीत विद्यापीठातील एक प्रगतीशील उपक्रम म्हणून 'कमवा व शिका' ही योजना गणली जाऊ लागली.

या योजनेमध्ये ज्या विद्यार्थ्यांची शिक्षण घेण्यासाठी श्रम करण्याची तयारी आहे अशा सर्व जाती–धर्माच्या मुलांना प्रवेश खुला होता. या योजनेमध्ये श्रमाची प्रतिष्ठा जपली जात होती. इथल्या दैनंदिन कामाचे नियोजन 'डे ऑफिसर' ('डे ऑफिसर' या संकल्पनेची चर्चा प्रकरण

क्र. २ मध्ये करण्यात आलेली आहे.) पद्धतीने चाले. दिवसाच्या कामाचा अहवाल 'डे ऑफिसर' हा दररोज संध्याकाळी योजनेच्या अधीक्षकाला देत असे. दररोजच्या कामकाजावेळी कधीकधी वादही होत असत. नंतर ही तक्रार कुलसचिवांकडे जाई. तेव्हा कॉर्नर मिटिंग्ज् होवून गुन्हा तपासणी होई. गुन्हेगारास योग्य शासन मिळे. विद्यार्थ्यांना न्याय मिळणे हे एक बौद्धिक असे.[६०] अशा प्रकारे योजनेतील विद्यार्थ्यांच्यात श्रमप्रतिष्ठा व शिस्त बाणवली जाई. परिस्थितीपुढे हतबल न होता परिस्थितीला गुलाम करण्याची शिक्षण व्यवस्था या योजनेमध्ये आहे.

"The sky is limited but education is unlimited"[६१] (आकाशाला मर्यादा पडतात पण शिक्षण हे अमर्याद आहे) हा आप्पासाहेबांचा द्रष्टेपणा या योजनेमधून दिसून येतो. ज्याचे मनोधैर्य व नैतिकता ही कष्ट करून शिक्षण घेण्याची आहे. अशा विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी देण्यासाठीच आप्पासाहेबांनी ही योजना सुरू केली होती. शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी सन २००६ साली विद्यार्थी भवनच्या इमारतीवर दुसरा मजला बांधून भवन इमारतीचे विस्तारीकरण केले. त्यामुळे आणखी ३० ते ४० विद्यार्थ्यांना योजनेत सामावून घेणे शक्य झाले.[६२] योजनेतील विद्यार्थीनींच्या राहण्याची व्यवस्था ही मुलींच्या वसतिगृहातच केली जाते.[६३] सध्याच्या २००८—२००९ या शैक्षणिक वर्षात सुमारे १२३ विद्यार्थी या योजनेचा लाभ घेवून आपले शिक्षण पूर्ण करत आहेत.[६४]

या योजनेपासून काहीतरी उत्पन्न मिळावे यासाठी ही योजना चालविली जात नसून या योजनेचा फायदा घेवून स्वतःच्या हिंमतीवर विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण पूर्ण करावे हा हेतू त्यापाठीमागे होता. आजही विद्यापीठात ही योजना यशस्वीपणे चालू असून तिचा विकास होत आहे.

## योजनेचे कार्यक्षेत्र :

'कमवा व शिका' योजना हा विद्यापीठाचा एक महत्त्वपूर्ण विभाग आहे. पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना या योजनेत प्रवेश घेता येतो. योजनेतील मुले प्रारंभी विद्यापीठाच्या शेतीत काम करत होती.

त्याचबरोबर विटाच्या भट्टीत काम करणे, हायवे कँटीन चालविणे, पिठाची गिरणी चालविणे अशा प्रकारची कामेही करत होती. बदलत्या काळानुसार योजनेच्या कार्यपद्धतीतील काही कार्यक्षेत्रे आज बंद आहेत तर काही नवीन कार्यक्षेत्रांची भर योजनेत पडलेली आहेत. अलिकडील काळात मुलींनाही या योजनेत सामावून घेतलेले आहे. कामाच्या बदल्यात या विद्यार्थ्यांची शिक्षणाबरोबर व जेवणाचीही व्यवस्था केली जाते.[६५]

## (अ) योजनेची काळानुरूप बंद झालेली कार्यक्षेत्रे पुढीलप्रमाणे :

### १) शेती विभाग :

'कमवा व शिका' योजनेची सुरूवात झाली तेव्हा योजनेतील विद्यार्थ्यांना काम देण्यासाठी शेती हाच प्रमुख विभाग होता. विद्यापीठाच्या विस्तृत परिसरापैकी शेतीयोग्य १५० एकर जमीन या विभागाअंतर्गत योजनेकडे सोपविलेली होती. सुरूवातीचे बहुतेक विद्यार्थी याच कार्यक्षेत्रात काम करत असत. कोल्हापूर हा भाग जास्त पर्जन्याचा असल्यामुळे प्रामुख्याने खाचरात भात शेती केली जायची. भात हे या विभागातील प्रमुख पीक होते. त्याचबरोबर ज्वारी, बाजरी, ऊस, कांदा, भुईमूग इत्यादी पिकांचेही उत्पादन घेतले जात असे. शेतीत काम करण्यासाठी लागणारी सर्व अवजारे योजनेकडे उपलब्ध होती. शेती कामासाठी योजनेची स्वत:ची अशी बैलजोडी होती.[६६] सोबत म्हैशीही होत्या. त्यापासून योजनेला दूध उपलब्ध होत असे. अतिरिक्त दुधाची विक्री केली जाई. त्याचबरोबर विद्यापीठ मेसला लागणारा भाजीपालासुद्धा या विभागाअंतर्गत पिकविला जाई. अतिरिक्त भाजीपाल्याची खुल्या बाजारपेठेत विक्री केली जात असे. योजनेतील सुरूवातीचे विद्यार्थी हे प्रामुख्याने ग्रामीण भागातील, शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे त्यांना शेतीची माहिती होती. पेरणी, बाळ कोळपी ओढणे, भांगलण, पीक काढणे, पीक मळणे इ. सर्व कामे विद्यार्थीच करत. १९७६–७७ साली शेतीत भाताची जवळजवळ ३०० पोती एवढे विक्रमी उत्पादन घेतले गेले.[६७]

शेती हा विभाग अगदी पारंपारिक व शारीरिक कष्टाचा होता. काळानुरूप समाजाचा शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन दुय्यम झाल्यामुळे विद्यार्थी या विभागात काम करण्यात कमीपणा मानू लागले. तसेच योजनेत दुसऱ्या नवनवीन कार्यक्षेत्रांची भर पडत गेल्यामुळे या विभागाकडे दुर्लक्ष होत गेले. परिणामी शेतीचे उत्पादन घटून या विभागात तोटा होवू लागला. त्यामुळे सुरूवातीच्या काळात योजनेचा मूलभूत गाभा असणारा हा शेती विभाग सन २००० साली बंद करण्यात आला.

## २) विटभट्टी विभाग :

शिवाजी विद्यापीठात चालविला जाणारा व शारीरिक कष्टावर आधारित असा हा विभाग होता. या विभागात विटा तयार करण्याच्या कामात तज्ञ असा एक पन्नास—पंचावन्न वयाचा कुंभार काम करत असे. त्याच्या मार्गदर्शनाखाली योजनेतील मुले सकाळी ६ ते १० व संध्याकाळी ३ ते ६ या वेळात विटा तयार करण्याचे काम करत असत.[६८] विद्यार्थी भवनच्या बांधकामासाठी लागणाऱ्या विटा तयार करण्यासाठी सुरू केलेली ही भट्टी पुढे योजनेतील मुलांना काम देण्यास उपयोगात आणली गेली. भवनच्या बांधकामासाठी लागणाऱ्या विटा याच भट्टीतून श्रमदानातून तयार करण्यात आल्या होत्या.[६९] विद्यापीठाच्या प्रारंभीच्या काळात विद्यापीठ प्रशासकीय इमारती, वसतिगृहे, कर्मचारी निवासस्थाने इत्यादींचे बांधकामासाठी लागणाऱ्या विटा याच विभागातून बनविल्या जात असत. प्रसंगी अतिरिक्त विटांची बाहेर विक्री केली जात असे. विटभट्टीसाठी लागणारी लाल माती, कोळसा, भाताचा भुसा, इंधन, विटांचे साचे यांची खरेदी खुल्या बाजारातून केली जाई.[७०] नंतर भाताचा भुसा हा विद्यापीठाच्या शेतीतून मिळू लागला. योजनेला उत्पन्न मिळवून देणारा असा हा विभाग होता. पदव्युत्तर शिक्षण घेणारी मुले अडाणी कुंभाराच्या हाताखाली स्वत: चिखलात घुसून विटा बनविण्याचे काम करत असत हा त्या काळातील अगदी अविस्मरणीय असा देखावा असे.

कालांतराने विद्यापीठातील इमारतींचे बांधकाम पूर्ण झाल्यामुळे विद्यापीठातून विटांची मागणी बंद झाली, कच्च्या मालाची किंमत वाढली, खाजगी विटभट्ट्यांची संख्या, वाढली इत्यादी कारणांमुळे या विभागाला होणाऱ्या नफ्यात घट होवू लागली. तसेच समाजाची शारीरिक कष्टाची कामे करण्याची मानसिकता कमी होवू लागल्यामुळे हा विभाग बंद करून योजनेतील मुलांना दुसऱ्या कार्यक्षेत्रात काम दिले जाऊ लागले.

**३) हायवे कॅन्टिन विभाग :**

शेती, विटभट्टी इत्यादी विभागांबरोबरच योजनेतील मुलांना श्रमासाठी नवीन कार्यक्षेत्र निर्माण करून त्याद्वारे योजनेसाठी काही नफा मिळवावा या हेतुने विद्यापीठ परिसरातून जाणाऱ्या पुणे—बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वरती सध्याच्या "यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, विभागीय कार्यालय, कोल्हापूर" या इमारतीत १९७२ साली डॉ. आप्पासाहेब पवार यांनी हायवे कॅन्टिनची सुरूवात केली.[७१] या कॅन्टिनमुळे पुणे—बेंगलोर रस्त्यावरील वाहन चालकांची तसेच विद्यापीठ कर्मचारी व विद्यार्थ्यांचीही अल्पोपहाराची सोय झाली. या कॅन्टीनसाठी सुरूवातीला लागणारे चमचे, भांडी, प्लेट, गॅस, इत्यादी साहित्य योजनेच्यामार्फत पुरविले गेले. या कॅन्टीनमध्ये काम करण्यासाठी एक आचारी व दोन वेटर यांची पगारावर नेमणूक केली गेली. योजनेतील विद्यार्थी काऊंटर सांभाळणे, कॅन्टीनला लागणारा सर्व कच्चा माल स्टोअरमधून आणून पुरविणे, प्रसंगी वेटरचे काम करणे इत्यादी कामे करत असत. विद्यापीठात पदवीदान समारंभ, क्रीडा स्पर्धा यासारखे मोठे कार्यक्रम असताना तेथे या कॅन्टीनमार्फत अल्पोपहाराचे स्टॉल चालविले जात असत. तेव्हा योजनेचे विद्यार्थी वाढप्याचे काम करण्यापासून प्लेट धुण्यापर्यंत सर्व कामे करत असत.[७२] योजनेला चांगले उत्पन्न मिळवून देणारा हा विभाग होता. १९७५ च्या दरम्यान मासिक अडीच ते तीन हजार रूपये एवढे उत्पन्न या विभागातून मिळत असे.[७३]

कालांतराने हायवे कॅन्टीनच्या आजूबाजूला खाजगी स्टॉलची संख्या वाढली. ते विद्यापीठ कॅन्टीनपेक्षा कमी किंमतीत चहा व नाष्ट्याचे पदार्थ देवू लागले. तसेच वाहतूकीच्या सोयींसाठी राष्ट्रीय महामार्गाचा मार्ग बदलून तो शहराबाहेरून सुरू केला गेला. अशा विविध समस्यांमुळे या कॅन्टीनचा उत्पादन खर्च वाढून नफा कमी कमी होवू लागला. अखेर १९९० साली हा विभाग बंद करण्यात आला.

**४) जुना मेस विभाग :**

विद्यार्थ्यांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यासाठी विद्यापीठात मेसची व्यवस्था होती. प्रारंभीच्या काळात स्वयंपाक हा चुलीवर होत असे. त्यासाठी जळाऊ लाकूड गोळा करणेचे काम विद्यार्थी करत असत. तसेच या विभागासाठी लागणारा भाजीपाला, धान्य हे शेती विभागातून पिकविलेले असे. शेती विभाग बंद झाल्यानंतर धान्य व भाजीपाला खुल्या बाजारातून मागविला जाई. या विभागाअंतर्गत दोन वेळचे जेवण बनविले जाई. सकाळी चपाती व संध्याकाळी भाकरी असे. तर महिन्यातून एकदा फिस्ट (मेजवाणी) चा बेतही असे. या कामासाठी एक आचारी व ४ महिलांची पगारावर नेमणूक केलेली होती. योजनेचे विद्यार्थी तांदूळ निवडणे, कांदा चिरणे, वाढप्याचे काम करणे इत्यादी प्रकारची कामे करत असत. या विभागाअंतर्गत भवन मेस, विद्यार्थीनी वसतिगृह मेस व विद्यार्थी मेस चालविली जात असे. यापासूनही योजनेला उत्पन्न मिळविले जायचे. परंतु विद्यापीठ प्रशासनाच्या निर्णयानंतर सन २००३ साली विद्यार्थीनी वसतिगृह मेस व २००६ साली विद्यार्थी वसतिगृह क्र. ३ ची मेस यांचे व्यवस्थापन स्वतंत्र केले गेले.[७४] त्यामुळे योजनेला मिळणारे अतिरिक्त उत्पादन कमी झाले व हा विभाग बंद करण्यात आला.

**(ब) योजनेची सध्या सुरू असलेली कार्यक्षेत्रे पुढीलप्रमाणे:**

**१) भवन कार्यालय विभाग :**

'कमवा व शिका' योजनेतील सर्व मुलांच्या राहण्याची व्यवस्था ही डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनमध्ये करण्यात आलेली आहे. त्या भवनच्या तळमजल्यावर एका खोलीत या योजनेचे कार्यालय आहे. योजनेच्या अधीक्षकांच्या देखरेखीखाली या योजनेचे कामकाज चालते. तेथे एक लेखनिक व एक शिपाई यांची नेमणूक विद्यापीठातर्फे केलेली आहे. योजनेच्या दैनंदिन कामकाजाच्या नोंदी रोजच्या रोज येथे ठेवलेल्या असतात. या भवन कार्यालयाला विद्यापीठातर्फे दोन संगणक देण्यात आलेले आहेत. सर्व नोंदी त्यात ठेवल्या जातात. या कामकाजात मदतनीस म्हणून योजनेतील विद्यार्थी नेमून दिलेल्या वेळी कामे करतात.[७५]

**२) भवन वाचनालय विभाग :**

योजनेतील मुले ही नेमून दिलेली कामे करून आपले शिक्षण पूर्ण करतात. त्यांच्या कामाच्या वेळा या त्यांचे दररोजचे शैक्षणिक वेळापत्रक पाहून नियोजित केलेल्या असतात. या कामावरून परत आल्यावर भवनच्या विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी बाहेर जावे लागू नये म्हणून फक्त योजनेतील मुलांसाठी भवन वाचनालय सुरू करण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या पुस्तकांबरोबरच अवांतर वाचनासाठी असणाऱ्या पुस्तकांनी सुसज्ज असे हे छोटेसे ग्रंथालयच आहे. ते दररोज सकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत चालू असते. या वाचनालयाची देखरेख करणे, विद्यार्थ्यांना पुस्तके वितरीत करून जमा झालेली पुस्तके व्यवस्थित जागच्या जागी ठेवणे इत्यादी सर्व प्रकारची कामे योजनेतील विद्यार्थी नेमून दिलेल्या वेळेत करतात.[७६]

**३) मेस विभाग :**

विद्यार्थी भवनच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अशी मेस योजनेद्वारे चालविली जाते. यामध्ये एक आचारी व चार महिला यांची योजनेतील मुलांचे जेवण बनविण्यासाठी पगारावर नेमणूक केलेली आहे. जेवण



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

बनविताना त्यांना मदत करणे व मुलांना जेवण वाढण्याचे काम योजनेतील मुले करतात. तसेच मुलींच्या वसतिगृहातील मेसमध्ये जेवण वाढण्याचे काम योजनेतील मुलीच करतात.[७७]

**४) पिठाची गिरणी :**

या योजनेअंतर्गत विद्यापीठ परिसरात एक पिठाची गिरण चालविली जाते. तिची स्थापना १ जानेवारी १९७१ साली मा. कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या हस्ते झाली.[७८] ही गिरण दररोज दुपारी ३ पासून ते रात्री ९ पर्यंत चालविली जाते. योजनेतील विद्यार्थी नेमून दिलेल्या वेळेप्रमाणे गिरण चालविण्याचे काम करतात. या गिरणीमध्ये भवन मेसच्या दळणाबरोबर विद्यापीठ परिसरातील सर्व वसतिगृहांचे दळण व विद्यापीठात वास्तव्याला असणाऱ्या कर्मचाऱ्यांची दळणे दळली जातात. याचबरोबर परिसरातील अन्य लोकांचीही धान्ये दळून दिली जातात. याद्वारे योजनेसाठी उत्पन्न मिळविले जाते.[७९]

**५) झेरॉक्स विभाग :**

विद्यापीठात मुख्य प्रशासकीय इमारतीच्या पाठीमागे स्वतंत्र असा हा झेरॉक्स विभाग आहे. या विभागात तीन झेरॉक्स मशीन आहेत. त्यापैकी एका झेरॉक्स मशीनचा वापर फक्त विद्यापीठातील प्रशासकीय कामासाठी केला जातो. तर उर्वरित दोन मशीनचा वापर विद्यार्थ्यांसहीत सर्वांसाठी खुला आहे. याचा दररोजचा हिशोब हा भवन कार्यालयास सादर केला जातो. सकाळी ८ ते संध्याकाळी ८ या वेळेत सुरू असणाऱ्या या विभागाचे काम योजनेतील विद्यार्थ्यांमार्फतच पाहिले जाते. यापासूनही योजनेला उत्पन्न मिळते.[८०]

**६) टेलिफोन विभाग :**

योजनेअंतर्गत चालविला जाणारा हा ही एक स्वतंत्र विभाग आहे. विद्यापीठ मुख्य इमारतीच्या पाठीमागे एस.टी.डी., आय.एस.डी. व पी.सी.ओ. ची व्यवस्था असणारे सुसज्ज असणारे असे टेलिफोन सेवा केंद्र आहे. तसेच मुलींच्या वसतिगृहातही एक लोकल फोन बॉक्स आहे. त्याची

व्यवस्था योजनेतील मुली पाहतात. सकाळी ८ पासून संध्याकाळी ८ पर्यंत ही केंद्रे चालविली जातात. या केंद्राचा दैनंदिन हिशोब हा भवन कार्यालयात सादर केला जातो. या विभागाची सर्व व्यवस्था योजनेतील विद्यार्थी पाहतात. यापासूनही योजनेसाठी उत्पन्न मिळविले जाते.[८१]

**७) इंटरनेट विभाग :**

ग्रंथालय इमारतीतील इंटरनेट विभागात एकूण २०० संगणक आहेत. विद्यापीठातील सर्व मुलांना आपले ओळखपत्र दाखवून याचा लाभ घेता येतो. येथे येणाऱ्या सर्व मुलांची नोंद ठेवून त्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी विद्यापीठ प्रतिनिधीची नेमणूक केलेली आहे. त्याला मदत करण्याचे काम योजनेतील विद्यार्थी करतात.[८२]

**८) बागकाम विभाग :**

विद्यापीठाचा परिसर हा खूपच मोठा आहे. विद्यापीठाचे ग्रंथालय, अतिथीगृह, विविध विभागांचा दर्शनी भाग, मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील जागा इत्यादी ठिकाणी बागेची आखणी केलेली आहे. याचे काम पाहण्यासाठी एका माळ्याची नेमणूक विद्यापीठाने केली आहे. या माळ्याला बागेची निगा राखणेकामी मदत करण्याचे काम योजनेतील विद्यार्थी करतात.[८३]

**९) ग्रंथालय विभाग :**

या विभागात योजनेतील मुले ग्रंथालयात मदतनीस म्हणून काम करतात. नेमून दिलेल्या वेळी हे विद्यार्थी ग्रंथालयातील पुस्तके व्यवस्थित वितरीत करून पुन्हा जागच्या जागी ठेवणे, नवीन पुस्तकांची वर्गवारी करून मांडणी करणे अशा प्रकारची कामे करतात.[८४]

**१०) दुर्मिळ विभाग :**

विद्यापीठातील या अतिशय महत्त्वाच्या विभागातही योजनेतील विद्यार्थी दुर्मिळ विभाग प्रमुखांना मदतनीस म्हणून काम करतात. या विभागातील दुर्मिळ वस्तु, दुर्मिळ पुस्तके यांची निगा राखणे, संशोधकांनी

वापरल्यानंतर ती पुस्तके पुन्हा मूळ जागी ठेवणे इत्यादी कामे योजनेतील विद्यार्थी नेमून दिलेल्या वेळेत करतात.[८५]

**११) संदर्भ विभाग :**

या विभागात विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी संशोधकांचे प्रबंध, लेख तसेच उपलब्ध सदंर्भांची साधने ठेवलेली असतात. संशोधकांना त्यांच्या उपयोगाची संदर्भ साधने मिळवून देणे तसेच संशोधकांनी वापरल्यानंतर ती साधने पुन्हा त्याच ठिकाणी नेवून ठेवणे इत्यादी कामे योजनेतील विद्यार्थी करतात.[८६]

**१२) विमान इमारत विभाग :**

विद्यार्थी भवनच्या दक्षिणेस सर्व विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी बांधण्यात आलेल्या स्वतंत्र अभ्यासिकेच्या इमारतीला विमान इमारत (प्लेन बिल्डींग) असे म्हणतात. ही अभ्यासिका सकाळी ६ पासून ते रात्री १२ पर्यंत चालू असते. या अभ्यासिकेमध्ये विद्यापीठाच्या बाहेरीलही विद्यार्थ्यांना ठराविक शुल्क आकारून प्रवेश दिला जातो. या अभ्यासिकेचे छोटेसे असे स्वतंत्र ग्रंथालयही आहे. येथे येणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंद करणे, येथील पुस्तकांची मांडणी करून त्यांच्या देव–घेवीची नोंद ठेवणे यासारखी कामे योजनेतील मुले करतात.[८७]

**१३) दवाखाना विभाग :**

शिवाजी विद्यापीठ परिसरात तातडीची औषधपाण्याची व्यवस्था करण्यासाठी एका दवाखान्याची उभारणी करून एका डॉक्टरची नेमणूक केलेली आहे. सर्व विद्यार्थ्यांना येथे मोफत सुविधा पुरविली जाते. येथील डॉक्टरना मदतनीस म्हणून योजनेतील मुले नेमून दिलेल्या वेळी काम करतात.[८८]

**१४) क्रिडा विभाग :**

विमान इमारतीशेजारी विद्यापीठाचे सुसज्ज असे 'क्रिडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडांगण' आहे. या क्रिडांगणावरील गवत काढणे, साफसफाई करून विभागातील सर्व साधनसामग्रीची देखभाल करणे इत्यादी

कामे योजनेतील मुले करतात. स्पर्धेच्या आयोजनावेळी योजनेतील जादा मुलांची तात्पुरती नियुक्ती क्रीडांगण विभागात केली जाते.[८९]

**१५) प्रकाशन विभाग :**

विद्यापीठातर्फे विविध नियतकालिके, पुस्तके, अहवाल, प्रकाशित होत असतात. ही प्रकाशने पूर्ण करण्यासाठी प्रकाशन विभागाला विविध विभागातून माहिती गोळा करावी लागते. याकामी योजनेतील मुले मदतनीस म्हणून काम करतात.[९०]

**१६) पुस्तक विक्री विभाग :**

विद्यापीठात प्रकाशन विभागाअंतर्गत चालविला जाणारा हा एक विभाग आहे. येथे विद्यापीठ प्रकाशने, विविध अर्ज विक्रीसाठी ठेवलेले असतात. येथे काऊंटरवर पुस्तकांची विक्री करणे, विक्रीच्या पुस्तकांची व्यवस्थित मांडणी करणे इत्यादी कामे योजनेतील विद्यार्थी करतात.[९१]

**१७) नियतकालिके विभाग :**

विद्यापीठातील विद्यार्थ्यांना रोज दैनिके, साप्ताहिके, मासिके, विविध नियतकालिके वाचनासाठी उपलब्ध करून देण्यासाठी सध्याच्या ग्रंथालय इमारतीच्या पहिल्या मजल्यावर हा नियतकालिके विभाग सुरू करण्यात आलेला आहे. या विभागातील सर्व वस्तूंची देखरेख करून त्याची व्यवस्थित मांडणी करण्याचे काम योजनेतील विद्यार्थी करतात.[९२]

**१८) इंजिनिअरिंग विभाग :**

विद्यापीठात विविध इमारतींचे नूतनीकरण चालू असते. हे बांधकाम विद्यापीठातील इंजिनिअरांच्या मार्गदर्शनाखाली होत असते. त्यामध्ये प्लंबिंगचे साहित्य, इलेक्ट्रीकल साहित्य इ.ची देखरेख करणेकामी मदतनीस म्हणून योजनेतील विद्यार्थी काम करतात.[९३]

**१९) मुख्य प्रशासकीय इमारत विभाग :**

विद्यापीठाच्या प्रशासकीय कामाचा व्याप खूप मोठा आहे. येथील रोज कीर्द विभाग, अंतर्गत लेखापरिक्षण, पी.जी.बिल्स विभाग, जमा

स्वीकृती विभाग, परीक्षा बिल देयक इत्यादी विभागात योजनेतील मुले नेमून दिलेल्या वेळी मदतनीस म्हणून काम करतात.[९४]

## २०) मुद्रणालय विभाग :

विद्यापीठामध्ये असणारा हा एक प्रमुख विभाग आहे. विविध विद्यापीठ प्रकाशनांची छपाई या विभागात केली जाते. मुद्रणालयात गरजेनुसार मदतनीस म्हणूनही योजनेतील विद्यार्थी काम करत असतात.[९५]

अशाप्रकारे श्रमांवर आधारित चालविली जाणारी ही 'कमवा व शिका' योजना आहे. योजनेअंतर्गत चालणाऱ्या विविध स्वरूपाच्या कामावरून असे दिसते की, या योजनेत कोणतेही काम वर्ज्य मानले जात नाही. विद्यार्थ्यांच्या लेक्चर्सच्या वेळेव्यतिरिक्त त्यांचे कामांचे तास ठेवलेले असतात. दिवसभर शिक्षण व काम यांत गुंतून राहिल्यामुळे विद्यार्थ्यांना भवन हे स्वतःच्या घरापेक्षा वेगळे वाटत नाही. योजनेतील मुले स्वावलंबी तत्त्वावर रोज तीन तास नेमून दिलेली कामे करून स्वतःचे शिक्षण पूर्ण करतात. या विविध उपक्रमातून मिळणाऱ्या उत्पन्नातून विद्यार्थ्यांचा भोजन, निवास व सर्व शैक्षणिक खर्च भागविला जातो. विद्यापीठातील इतर वसतिगृहाप्रमाणेच कॉटस्, टेबल, खुर्ची, संडास, बाथरूम इत्यादी सुविधा विद्यार्थी भवनमध्येसुद्धा पुरविल्या गेल्या आहेत. योजनेतील सर्व मुलांवर कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार व कुलसचिव डॉ. उषा इथापे (बाईसाहेब) माता–पित्याप्रमाणे प्रेम करीत असत. आपल्या कुलगुरू पदाच्या व्यापातूनही वेळात वेळ काढून आप्पासाहेब विद्यार्थी भवनमध्ये जाऊन त्यांच्याबरोबर खरडा भाकरी खात असत. सहभोजनाच्या कार्यक्रमात तर आप्पासाहेब पवार भवनच्या वसतिगृहाच्या मध्यभागी बसूनच जेवण करत असत.[९६] तसेच योजनेतील विद्यार्थ्यांशी एखाद्या मित्राप्रमाणे संवादही साधन असत. या मुलांना श्रमाबरोबर शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगताना आप्पासाहेब म्हणत की, "लक्षात ठेवा तुम्ही इथे कामासाठी नाही आलात. तुमचे मुख्य काम आहे अभ्यास. एखादे वेळी काम बुडाले तरी चालेल पण अभ्यास चुकवू नका. मन लावून अभ्यास करा. भवनचा विद्यार्थी विभागात प्रथम आला

पाहिजे. नोकरीची चिंता करू नका. मी देईन तुम्हाला नोकरी."[९७] यावरून आप्पासाहेबांची योजनेतील विद्यार्थ्यांविषयी असलेली आत्मियता दिसून येते. कुलगुरू किंवा कुलसचिव यांचे वाहन विद्यार्थी भवनच्या बाजूने बहुधा जात येत असे. त्यावेळी जर योजनेचे विद्यार्थी कामावरून परत येत असतील तर ते स्वत: वाहन थांबवून विद्यार्थ्यांना त्यांच्या मातीचे डाग पडलेल्या कपड्याबरोबर खुरप्यासहित गाडीत बसवून त्यांना विद्यार्थी भवनवर प्रथम सोडत असत. नंतरच पुढे मुख्य इमारतीकडे त्यांची गाडी जात असे.[९८]

शिवाजी विद्यापीठातील या महत्त्वकांक्षी योजनेचे सर्व स्तरातून स्वागत होत होते. विद्यापीठाला भेट देणारे नामवंत पाहुणे या योजनेला अगदी आत्मियतेने भेट देत असत. विद्यापीठाच्या सहाव्या पदवीदान समारंभासाठी तत्कालिन केंद्रिय शिक्षणमंत्री डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव हे प्रमुख म्हणून २५ सप्टेंबर १९६९ साली विद्यापीठात आले होते.[९९] अल्पावधित विद्यापीठाने केलेली प्रगती पाहून ते प्रभावित झाले होते. विद्यार्थ्यांनी श्रमदानातून बांधलेल्या वास्तूलाही भेट त्यांनी दिली. या योजनेतील विद्यार्थी शारीरिक कष्टाची कामे करून आपले उच्च शिक्षण पूर्ण करीत आहेत हे पाहून त्यांना खूपच अभिमान वाटला. मराठी येत नसताना देखील त्यांनी मराठीतून मोडके—तोडके चार शब्दांचे भाषण करून या योजनेची अत्यंत आत्मियतेने पाठराखण केली.[१००]

३० डिसेंबर, १९६९ साली विद्यापीठात विशेष पदवीदान समारंभासाठी भारताचे तत्कालिन राष्ट्रपती मा. डॉ. व्ही. व्ही. गिरी आले होते. जेव्हा ते विद्यार्थी भवनला भेटीसाठी गेले तेव्हा भवनच्या पूर्वेकडील भागात खळ्यावर ज्वारीची मळणी चालू होती. बाजूलाच ज्वारीच्या पोत्यांची थप्पी लागलेली होती. पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थी अशा प्रकारचे काम करून शिकतात हे पाहून त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला व विशेष आनंदही झाला. त्यांनी योजनेच्या बैलजोडीमध्ये उभे राहून स्वत:चा फोटोही काढून घेतला होता.[१०१] महाराष्ट्राचे राज्यपाल व विद्यापीठाचे कुलपती न्यायमूर्ती एस्. पी. कोठारी यांच्या हस्ते राष्ट्रपतींना 'डॉक्टर ऑफ लॉ' ही

सन्माननीय पदवी प्रदान केली गेली.[१०२] यानंतरच्या आपल्या दीक्षांत भाषणात या क्रांतिकारी उपक्रमाचा खास गौरव राष्ट्रपतींनी केला.

अशाच एका प्रसंगी मा. यशवंतराव चव्हाण योजनेतील मुलांच्या भेटीसाठी विद्यार्थी भवनला आले असताना, श्री. डी. व्ही. तोगले या भवनच्या विद्यार्थ्यांची चव्हाण साहेबांना ओळख करून देताना आप्पासाहेब म्हणाले की, "शेतकऱ्याचं पोर इंग्रजीत पीएच.डी. करतयं" तेव्हा यशवंतरावांनी त्या विद्यार्थ्याला पोटाशी धरून त्याच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.[१०३] हा विद्यार्थी माझा आहे व मी या विद्यार्थ्याचा आहे, हा विचार डॉ. आप्पासाहेबांच्या मनात होता. म्हणूनच ही 'कमवा व शिका' योजना अगदी आदर्श योजना म्हणून नावारूपास आली. समाजातील जाणकारांना याविषयी आस्थाच होती. त्याचबरोबर ना. बाळासाहेब देसाई, ना. वसंतराव दादा पाटील, न्यायमूर्ती एस. पी. कोठारी, श्री. श्रीमाळ, मधुकरराव चौधरी, भाई माधवराव बागल, एन. डी. पाटील, मा. वसंतरावजी नाईक, श्री. विजय मर्चंट, श्री. नवाब अल्लीयावर जंग, न्यायमूर्ती जी. एन्. वैद्य इत्यादी मान्यवरांच्या भेटीही योजनेच्या दृष्टीने संस्मरणीय ठरल्या आहेत.[१०४]

'कमवा व शिका' योजनेने विद्यार्थ्यांवर स्वाभिमान व स्वावलंबनाचे संस्कार केले आहेत. विद्यापीठातील 'कमवा व शिका' या योजनेमधून आपले शिक्षण पूर्ण केलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. डॉ. पांडुरंग जयवंत केचे विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग हे या योजनेचे माजी विद्यार्थी होते. त्यांनी विटा तयार करणे, हायवे कॅन्टीनमध्ये काम करणे तसेच शेतीत भात लागण, खुरपणी, मळणी इत्यादी स्वरूपाची कामे केली होती.[१०५] तसेच डॉ. सी. टी. पवार हेही योजनेचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी विद्यार्थी भवन बांधण्याच्या श्रमदान शिबिरातही भाग घेतला होता. त्याचप्रमाणे 'कमवा व शिका' योजनेच्या प्रथम वर्षाच्या पहिल्या तुकडीचेही ते विद्यार्थी होते. त्यांनी वीट भट्टीत काम करणे, वसतिगृह आवारातील गवत काढणे, भात लागण

करणे, बाळ कोळपी ओढणे, मळणी करणे इत्यादी कामे योजनेत असताना केली होती. त्यानंतर ते विद्यापीठात भूगोल विषयाचे व्याख्याता म्हणून रूजू झाले व विभाग प्रमुख म्हणून तेथून निवृत्तही झाले. आपल्या कार्यकाळात त्यांनी योजनेतील मुलांवर जातीने लक्ष देवून योजना यशस्वीपणे राबविण्याकडे लक्ष दिले.[१०६]

प्राचार्य भैरव कुंभार हेही योजनेचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांचा विद्यार्थी भवन बांधण्याच्या श्रमदान शिबिरातही सहभाग होता. आकाशवाणी पुणे केंद्राने, 'शिवाजी विद्यापीठ दर्शन' या नावाचा एक विशेष कार्यक्रम दि. १८ नोव्हेंबर, १९७० रोजी १२ ते १२.३० या वेळेत शिवाजी विद्यापीठाच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त सादर केला होता. यात विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला होता. या श्रुतिकेत कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार, कुलसचिव डॉ. उषा इथापे व महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री ना. मधुकरराव चौधरी यांचे विद्यापीठासंबंधीचे विचार त्यांच्याच आवाजात ऐकविण्यात आले होते. ही श्रुतिका प्रा. सुधाकर पवार व भवनाचा विद्यार्थी असताना भैरव कुंभार यांनी तयार केली होती.[१०७] नागपूर विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण हेही योजनेचे माजी विद्यार्थी आहेत. भातचिखल, कोळपणी, प्राध्यापक निवास आवारातील गवत काढणे, विटा तयार करणे, इत्यादी कामे त्यांनी योजनेत असताना केलेली होती.[१०८]

'कमवा व शिका' या योजनेतून शिक्षण पूर्ण करून विविध क्षेत्रात नाव कमवलेले आहे अशा काही व्यक्तींची नावे डॉ. बी. एल. पाटील (संचालक, रयत शिक्षण संस्था, सातारा), प्रा. जी. एस. हिरेमठ, प्राचार्य डॉ. एस. जे. नाईक, डॉ. अंकुश मोरे (कामगार उपायुक्त, मुंबई), डॉ. सी. टी. पवार, डॉ. ए. पी. कुंभार, प्राचार्य डॉ. व्ही. एस. लिपारे, प्राचार्य भैरव कुंभार, प्रा. डॉ. एस. एच. पवार, प्रा. चंद्रकांत भोसले, प्राचार्य जे. जी. जाधव (सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा), डॉ. तुकाराम पाटील, डॉ. ए. डी. मुळीक, चंद्रकांत कुंभार कुंभार (जिल्हा पोलीस अधीक्षक, कोल्हापूर जिल्हा), प्राचार्य डॉ. डी. व्ही. तोगले, डॉ. एस. एन.

पठाण, प्रा. डॉ. एन. डी. कदम, डॉ. एल. टी. मोरे, डॉ. एल. एन. धनवडे, प्रा. आर. पी. चव्हाण, डॉ. आर. व्ही. निंबाळकर, प्रा. एन्. आय. दिवटणकर, डॉ. बापूसाहेब माने, प्रा. डॉ. एस. पी. शिंदे, डॉ. जेवूर, प्रा. आर. बी. माने, प्रा. डॉ. बी. बी. नलवडे, प्रा. टी. वाय. जाधव, प्रा. डॉ. पी. एन. शिंदे, प्रा. किसन कुराडे, प्रा. एन. ए. नाईकनवरे, डॉ. मुरलीधर डोंगरे, प्रा. जालिंदर सावंत अशी आहेत.[१०९]

सहाव्या विद्यापीठ अनुदान मंडळानेही 'कमवा व शिका' या नाविन्यपूर्ण योजनेचे कौतुक करून ही योजना इतर क्षेत्रातही अनुकरणीय आहे; अशा शब्दात योजनेचा गौरव केलेला आहे.[११०] अशी ही स्वावलंबी तत्त्वावर चालविली जाणारी योजना आहे. तसेच शिवाजी विद्यापीठात सुरू असणाऱ्या या स्वावलंबी शिक्षण योजनेचा गौरव सर्व स्तरातून होत आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना योजनेमुळे शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. अशा या अभिनव उपक्रमांची नोंद नॅक समितीनेही घेतलेली आहे. विद्यापीठाला बी प्लस (B+) हे मूल्यांकन देताना या समितीने आपल्या अहवालात या योजनेचाही गौरवाने उल्लेख केलेला आहे.[१११]

शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार हे विद्यापीठातील 'कमवा व शिका' योजनेचे शिल्पकार होते. विद्यापीठात २००५ – २००६ हे वर्ष त्यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे केले गेले. या वर्षात सामाजिक बांधिलकीतून योजनेच्या माजी विद्यार्थ्यांनी "डॉ. आप्पासाहेब पवार कमवा – शिका प्रतिष्ठान" ची स्थापना केली. प्रत्येक सभासद माजी विद्यार्थी रू. ५०००/– एवढी रक्कम कृतज्ञता निधी म्हणून प्रतिष्ठानमध्ये जमा करतात. या निधीतून योजनेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे, उत्तेजनपर बक्षिसे देणे, विविध स्पर्धांचे आयोजन करणे अशा प्रकारचे उपक्रम हाती घेवून योजना अधिक परिणामकारकपणे राबविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.[११२]

पुस्तकी ज्ञानापेक्षा अनुभवातून आलेलं ज्ञान हे चिरकाल टिकणारे असते. हा धागा पकडून अंमलात आणली गेलेली 'कमवा व

शिका' ही एक आदर्श अशी योजना आहे. या योजनेने सुसंस्कृत व सुजाण नागरिक निर्माण करण्याचे कार्य केले आहे. आर्थिक दुरावस्था ही कोणाच्याही उच्च शिक्षणाच्या आड येता कामा नये, जो कष्ट करून घाम गाळतो त्याला शिक्षण हे श्रमाच्या मोबदल्यात मिळाले पाहिजे हेच या योजनेचे उद्दिष्ट आहे.

**'मागेल त्याला काम व मागेल त्याला निवास' योजना :**

'कमवा व शिका' ही एक आदर्श अशीच योजना आहे. दरवर्षी या योजनेचा लाभ सुमारे १०० ते १५० विद्यार्थी घेतात. विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानाने ही अगदी नगण्य अशी संख्या आहे. आप्पासाहेबांनी विद्यापीठात सुरू केलेल्या या योजनेत आजही गरीब व गरजू विद्यार्थ्यांना प्रवेश देवून शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिली जात आहे. योजनेतील विद्यार्थ्यांची निवासाची सोय असलेल्या विद्यार्थी भवनमध्ये विद्यार्थी सामावून घेण्याची क्षमता ही मर्यादित अशी आहे. त्यामुळे इच्छा असूनही जास्त मुलांना या योजनेत प्रवेश देता येत नाही. याची खंत विद्यमान कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांना होती. कष्टाची तयारी असणारा कोणताही इच्छुक विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये या ध्येयाने प्रेरित होवून डॉ. माणिकराव साळुंखे यांनी 'कमवा व शिका' योजनेला समांतर अशा 'मागेल त्याला काम व मागेल त्याला निवास' या उपक्रमाची सुरूवात २००५ साली शिवाजी विद्यापीठात केली.[११३] या उपक्रमाचा पहिल्या वर्षी ३२५ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.[११४] या योजनेत ज्या विद्यार्थ्यांची श्रम करण्याची तयारी आहे अशा सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. या योजनेतील मुलांना विद्यापीठ परिसरात रोज तीन तास काम करण्याची संधी दिली जाते. त्याच्या मोबदल्यात त्यांना राहण्याची, जेवणाची व शैक्षणिक खर्चात सवलत दिली जात नाही. तर प्रत्येक तासाला १५ रूपये याप्रमाणे रोख पगार दिला जातो.[११५] याद्वारे या विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा खर्च भागला नाही तरी त्यातील काही खर्च विद्यार्थ्यांनी स्वत:च्या श्रमातून

मिळवावा हाच हेतू ही योजना सुरू करण्यामागे मा. डॉ. माणिकराव साळुंखे यांचा हेतू आहे. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचाही प्रतिसाद उत्तम आहे.

'कमवा व शिका' योजनेने विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे व प्रतिकूल परिस्थितीशी झगडण्याचे संस्कार दिले आहेत. आजच्या २१ व्या शतकात पूर्वीची असणारी श्रमनिष्ठा कमी होत चालली आहे. विद्यार्थ्यांची संख्यात्मक वाढ होत असताना गुणवत्तेची घसरण होवू लागली आहे. अशा काळात शिक्षण क्षेत्राला श्रमाचे महत्त्व पटवून देणारी 'कमवा व शिका' योजना अगदी उपयोगाची आहे. शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली 'कमवा व शिका' ही योजना यशस्वीपणे राबविली जात आहे.

**संदर्भ :**


१) डॉ. कुलकर्णी अ. रा., 'डॉ. आप्पासाहेब पवार — गेल्या शतकातील एक शिक्षण तज्ञ, इतिहास संशोधक आणि श्रेष्ठ प्रशासक', इतिहास शिक्षण महामंडळ, महाराष्ट्राचे त्रैमासिक, एप्रिल — जून, २००५, पृष्ठ — ५.

२) वार्षिक अहवाल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६३ — ६४, पृष्ठ — १७.

३) कित्ता, पृष्ठ — १७.

४) कित्ता, पृष्ठ — ३६.

५) कित्ता, पृष्ठ — ३६.

६) शिवसंदेश त्रैमासिक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, जानेवारी—मार्च, १९७३, पृष्ठ — २०.

७) कित्ता, पृष्ठ — २१.

८) वार्षिक अहवाल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६४ — ६५, पृष्ठ — ११.

९) वार्षिक अहवाल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६३ — ६४, पृष्ठ — २१.

१०) कित्ता, पृष्ठ — २२.

११) A Glimpse, The Development of Shivaji University, P-3.

१२) शिवसंदेश त्रैमासिक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, एप्रिल — जून, १९७३, पृष्ठ — ११.

१३) मुलाखत : डॉ. पवार सी. टी., दि. १९/९/२००८.

१४) डॉ. सौ. जाधव भाग्यश्री, शिवाजी विद्यापीठाचे शिल्पकार, कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार जीवन आणि कार्य (१९०६ – १९८१), पृष्ठ – २५२.

१५) दै. पुढारी, १३ मार्च, १९६३, पृष्ठ – २.

१६) दै. पुढारी, कोल्हापूर, ३ ऑक्टोबर, १९६३, पृष्ठ – १.

१७) शिवसंदेश त्रैमासिक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ऑक्टोबर–डिसेंबर, १९६९, पृष्ठ – ३५.

१८) 'श्रमयोगी', कमवा आणि शिका योजनेचा रौप्यमहोत्सवी समारंभ अंक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर पृष्ठ – २८.

१९) 'पितामह', कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार जन्मशताब्दी स्मृतीग्रंथ, ५ मे, २००६, पृष्ठ – ४.

२०) दै. पुढारी, कोल्हापूर, १३ मार्च, १९६९, पृष्ठ – २.

२१) दै. पुढारी, कोल्हापूर, २९ ऑक्टोबर, १९६८, पृष्ठ – २ व ३.

२२) 'पितामह', उपरोक्त, पृष्ठ – ३.

२३) वार्षिक अहवाल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६४ – ६५, पृष्ठ – २२.

२४) वार्षिक अहवाल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६६ – ६७, पृष्ठ – १४.

२५) शिवसंदेश त्रैमासिक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ऑक्टोबर – डिसेंबर, १९६८, पृष्ठ – ७.

२६) 'श्रमयोगी', उपरोक्त, पृष्ठ – ६.

२७) कित्ता, पृष्ठ – ६.

२८) कित्ता, पृष्ठ – ६.

२९) कित्ता, पृष्ठ – ६.

३०) शिवसंदेश त्रैमासिक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ऑक्टोबर – डिसेंबर, १९६८, पृष्ठ – २०.

३१) कित्ता, पृष्ठ – २२.

३२) कित्ता, पृष्ठ – २२.

३३) कित्ता, पृष्ठ – २३.

३४) 'श्रमयोगी', उपरोक्त, पृष्ठ – ५२.

३५) कित्ता, पृष्ठ – ५२.

३६) कित्ता, पृष्ठ – ५२.

३७) मुलाखत : डॉ. कुंभार ए. पी., दि. १७/७/२००८.

३८) वार्षिक अहवाल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६९ – १९७०, पृष्ठ – ४.

३९) मुलाखत : डॉ. पवार सी. टी., दि. १९/९/२००८.

४०) मुलाखत : प्राचार्य कुंभार भैरव, दि. १९/९/२००८.

४१) कित्ता

४२) कित्ता

४३) 'श्रमयोगी', उपरोक्त, पृष्ठ – २४.

४४) मुलाखत : प्राचार्य डॉ. लिपारे व्ही. एस., दि. २/९/२००८.

४५) कित्ता

४६) कित्ता

४७) मुलाखत : डॉ. पवार सी. टी., दि. १९/९/२००८.

४८) 'श्रमयोगी', उपरोक्त, पृष्ठ – २४.

४९) मुलाखत : डॉ. कुंभार ए. पी., दि. १४/७/२००८.

५०) कित्ता

५१) 'श्रमयोगी', उपरोक्त, पृष्ठ – २४.

५२) कित्ता, पृष्ठ – २४.

५३) मुलाखत : डॉ. पवार सी. टी., दि. १९/९/२००८.

५४) कित्ता

५५) मुलाखत : प्राचार्य कुंभार भैरव, दि. १९/९/२००८.

५६) 'श्रमयोगी', उपरोक्त, पृष्ठ — २४.

५७) शिवसंदेश त्रैमासिक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, मार्च १९६९, पृष्ठ — १४.

५८) मुलाखत : डॉ. कुंभार ए. पी., दि. १४/७/२००८.

५९) कित्ता

६०) 'पितामह', उपरोक्त, पृष्ठ — ५३

६१) कित्ता, पृष्ठ — ६४.

६२) मुलाखत : प्रा. लादे आर. एस., दि. १०/१०/२००८

६३) मुलाखत : प्रा. डॉ. शिंदे एस. पी., दि. २१/७/२००८

६४) मुलाखत : प्रा. डॉ. गुरव पी. एम., रेक्टर आप्पासाहेब विद्यार्थी भवन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, दि. ५/९/२००८.

६५) कित्ता

६६) मुलाखत : प्राचार्य जाधव जे. जी., दि. १५/९/२००८.

६७) मुलाखत : डॉ. माने बापूसाहेब, दि. १४/११/२००८.

६८) मुलाखत : डॉ. कुंभार ए. पी., दि. १४/७/२००८.

६९) 'श्रमयोगी', उपरोक्त, पृष्ठ — २१.

७०) मुलाखत : डॉ. कुंभार ए. पी., दि. १४/७/२००८.

७१) मुलाखत : डॉ. माने बापूसाहेब, दि. १४/११/२००८.

७२) कित्ता

७३) 'पितामह', उपरोक्त, पृष्ठ — ७६.

७४) मुलाखत : प्रा. लादे आर. एस., दि. १०/१०/२००८.

७५) मुलाखत : गयके सदाशिव राकेश, एम.ए.भाग १, दि. २४/११/२००८.

७६) मुलाखत : घाळी सुरेश बाळू, एम.एस्सी. भाग २, दि. २४/११/२००८

७७) मुलाखत : सोनवले शैलेन्द्र मोहन, एम.ए.भाग १, दि. २४/११/२००८
७८) वार्षिक अहवाल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७० — ७१, पृष्ठ — १८.
७९) मुलाखत : झगडे अधिक रामचंद्र, एम.ए. भाग १, दि. २४/११/२००८
८०) मुलाखत : जगताप राहुल रमेश, एम.ए. भाग १, दि. २४/११/२००८.
८१) मुलाखत :देशमुख विक्रम प्रदीपराव, एम.एस्सी. भाग २, दि. २४/११/२००८
८२) मुलाखत : थोरगुले दत्तात्रेय बाळासो, एम.ए. भाग २, दि. २४/११/२००८
८३) मुलाखत : जगदाळे श्रीकृष्ण तुळशीराम, एम.ए.भाग १,दि. २४/११/२००८
८४) मुलाखत : पाटील सदाशिव संभाजी, एम.एस्सी.भाग २,दि.२४/११/२००८
८५) मुलाखत : बंडगर समाधान अशोक, एम.ए. भाग १, दि. २४/११/२००८
८६) मुलाखत : मोरे समाधान दत्तात्रेय, एम.कॉम. भाग १, दि. २४/११/२००८
८७) मुलाखत : ढोपे विशाल तुकाराम, एम.एस्सी. भाग १, दि. २४/११/२००८
८८) मुलाखत : यादव दिपक आनंदराव, एम.ए. भाग १, दि. २४/११/२००८.
८९) मुलाखत : मगदूम विक्रम शिवाजी, एम.ए. भाग १, दि. २४/११/२००८.
९०) मुलाखत : कदम महादेव लक्ष्मण, एम.एस्सी. भाग १, दि. २४/११/२००८
९१) मुलाखत : चव्हाण राजेंद्र लक्ष्मण, एम.एस्सी.भाग २, दि. २४/११/२००८
९२) मुलाखत : भिसे अरूण नामदेव, एम.ए. भाग २, दि. २४/११/२००८.
९३) मुलाखत : कांबळे सचिन मशनू, एम.ए. भाग २, दि. २४/११/२००८
९४) मुलाखत : कांबळे दीपक सुभाष, एम.ए. भाग २, दि. २४/११/२००८
९५) मुलाखत : निकम दत्तात्रेय चंद्रकांत, एम.ए. भाग १, दि. २४/११/२००८
९६) 'पितामह', उपरोक्त, पृष्ठ — ४७.
९७) कित्ता, पृष्ठ — ६९.
९८) कित्ता, पृष्ठ — ४६.
९९) वार्षिक अहवाल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६९ — ७०, पृष्ठ — ८.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

१००) 'श्रमयोगी', उपरोक्त, पृष्ठ — १६.

१०१) कित्ता, पृष्ठ — ४४.

१०२) वार्षिक अहवाल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६९ — ७०, पृष्ठ — ९.

१०३) 'श्रमयोगी', उपरोक्त, पृष्ठ — ४४.

१०४) मुलाखत : प्राचार्य कुंभार भैरव, दि. १९/९/२००८.

१०५) 'पितामह', उपरोक्त, पृष्ठ — ५९.

१०६) मुलाखत : डॉ. पवार सी. टी., दि. १९/९/२००८.

१०७) शिवसंदेश त्रैमासिक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ऑक्टोबर — डिसेंबर, १९७०, पृष्ठ २७.

१०८) 'पितामह', उपरोक्त, पृष्ठ — ४६.

१०९) मुलाखत : डॉ. पवार सी. टी., दि. १९/९/२००८.

११०) 'श्रमयोगी', उपरोक्त, पृष्ठ — ५४.

१११) National Assessment and Accreditation Council (NAAC) Report, Mach 2003, P. – 16.

११२) 'पितामह', उपरोक्त, पृष्ठ — XX

११३) मुलाखत : प्राचार्य कुंभार भैरव, दि. १९/९/२००८.

११४) 'पितामह', उपरोक्त, पृष्ठ — ५७.

११५) मुलाखत : प्रा. डॉ. गुरव पी. एम., रेक्टर आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, दि. ५/९/२००८.